मा. अध्यक्ष महोदय, व सन्मा. सभागृह,

विरारचे सरपंच व प्रथम नगराध्यक्ष आमचे मामा स्वर्गिय भास्करभाऊ ठाकूर यांनी घालून दिलेल्या मार्गदर्शक तत्वाप्रमाणे तसेच मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब व मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब यांच्या कुशल नेतृत्वाखाली काम करणेस मला संधी मिळाली यात धन्यता मानतो. वसई विरार शहर महानगरपालिकेच्या लोकनियुक्त लोकप्रतिनिधींनी तयार केलेला हा चौथा व सभापती स्थायी समिती म्हणून माझे कार्यकाळातील दुसरा व परिवहन उपक्रमाचा प्रथम स्वतंत्र अर्थसंकल्प सादर करण्याचा बहुमान मला मिळाला याबद्दल मी त्यांचा व आपणा सर्वांचा अत्यंत आभारी आहे. महानगरपालिकेच्या कामकाजासाठी आपले आदरणिय लोकनेते, प्रथम महापौर, महापौर व इतर सन्मा. पदाधिकाऱ्यांसह वारंवार दिलेल्या भेटींमध्ये मा. ना. मुख्यमंत्री श्री. पृथ्वीराजजी चव्हाण साहेब, मा.ना. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार साहेब, विधानपरिषदेचे उपसभापती मा. ना. श्री. वसंतरावजी डावखरे साहेब, पालकमंत्री मा. ना. श्री. गणेशजी नाईक साहेब, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. आमदार श्री. निरंजनजी डावखरे साहेब, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे आजी माजी आयुक्त तसेच केंद्र शासनाचे व राज्य शासनाचे सनदी अधिकारी, यांच्या वेळोवेळीच्या सदिच्छा व मार्गदर्शन आपल्या पाठीशी सदैव राहीले आहे. बहुजनांचा विचार करुन बहुजनांच्या हितासाठी असलेला बहुजनांचाच हा अर्थसंकल्प सादर करताना आदरणिय लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. महापौर श्री. नारायणजी मानकर साहेब, मा. प्रथम महापौर श्री. राजीवजी पाटील साहेब, मा. प्रथम उपमहापौर  श्री. सगिरजी डांगे साहेब, मा. उपमहापौर श्री. रुपेशजी जाधव साहेब, मा. सभागृह नेते श्री. उमेशजी नाईक साहेब, यांचे नियमित विशेष मार्गदर्शन तसेच सर्व प्रभाग समित्यांचे सभापती सर्व पदाधिकारी यांनी मला वेळोवेळी भेटुन केलेल्या मौलीक सुचना यासर्वांचे प्रतीबिंब या अर्थसंकल्पात आहे. मा. विरोधी पक्षनेत्यांसह, सर्व सन्मा. गटनेते व सदस्यांकडून तसेच सर्व सन्मा. नागरीकांकडून देखील त्यांचे विचार व अपेक्षा आणि कल्पना जाणून घेण्याचा आम्ही यथोचित प्रयत्न केला असुन त्याबाबीदेखील या अर्थसंकल्पात विचारात घेतल्या आहेत.

तिसरी मुंबई म्हणून नावारुपाला येत असलेल्या आपल्या महानगरात, मुंबईसह अन्य, विकसीत महानगरात कामधंद्यानिमीत्त रोज ये - जा करणारे अनेक मान्यवर नागरीक वास्तव्य करीत आहेत. त्यामुळे या आधीच विकसीत झालेल्या महानगरातील सोयीसुविधांची तुलना नकळतपणे आपल्या महानगराशी केली जाणे स्वाभाविक आहे. जनतेच्या या भावनांचा विचार करुन आपल्या महानगराच्या विकासाचा प्रगल्भ दृष्टीकोन ठेवणारे आपले लोकनेते मा. श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब हे आम्हाला वेळोवळी मार्गदर्शन करीत आहेत. त्यांच्या द्रेष्टेपणाचे प्रतिबींब या अर्थसंकल्पात जागोजागी उमटले आहे. याचा आम्हास अभिमान आहे.

मा. स्थायी समिती सभापती म्हणून कामकाजाच्या सुरुवातीलाच अर्थसंकल्प तयार करण्याची प्राप्त झालेली संधी, गतवर्षाच्या प्रत्यक्ष जमा खर्चाचा आढावा व आपले मागील अनुभव, निश्चित उत्पन्नाचे मार्ग, भविष्यकालीन विकास योजना, मुलभूत व पायाभूत गरजा, महानगरातील सर्व समाज घटकांच्या महानगरपालिकेकडून असलेल्या वाढत्या अपेक्षा याबाबींचा विचार करुन सर्व समावेशक व लोकाभिमुख असा अर्थसंकल्प मा. स्थायी समितीने आपणापुढे सादर केला आहे. सन २०११-१२-१३-१४ या वित्तीय वर्षात अर्थसंकल्पीय तरतुदीनुसार हाती घेतलेली कामे लगतनंतरच्या वर्षात आवश्यक कार्यवाही होऊन पुर्ण होत गेल्याने अर्थसंकल्पातील योजना मार्गी लागल्या आहेत.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ च्या कलम १०२ मधील तरतुदींचा विचार करता प्रशासकिय मान्यता देण्यापुर्वी अर्थसंकल्पात आवश्यक तरतुद असणे आवश्यक असल्याने प्रशासकिय मंजुरी द्यावयाच्या अर्थसंकल्पीय वर्षात तरतुदी करुन तरतुदीनुसार कामे हाती घेऊन लगतनंतरच्या वर्षात पुर्ण झाली आहेत. प्रत्यक्ष प्रदाने मात्र लगतनंतरचे वर्षात होत असल्याची वस्तुस्थिती विचारात घेऊन अशा तरतुदी पुढील वर्षात करण्याच्या दृष्टीने कार्यवाही यापुढे करण्याचे प्रस्तावित आहे. ज्यायोगे अर्थसंकल्प व जमा - खर्चात फारशी तफावत दिसणार नाही.

विकास आराखडा तयार करुन त्यानुसार कामाचे नियोजन करुन नियोजनबद्ध विकास करणेसाठी कृती आराखडा तयार करणेची कार्यवाही आता पुर्ण झाली असल्याने संपुर्ण क्षमतेने जलद गतीने समाधानकारकरित्या विकास कामे पुर्ण होण्याचा निर्माण झालेला विश्वास, सन २०१४-१५ मध्ये हाती घ्यावयाच्या अनेक कामांबाबत फेब्रुवारी २०१४, पासूनच सुरू झालेली प्रशासकिय मान्यता देण्याची व अंदाजपत्रक तयार करणेची कार्यवाही व काटेकोर अंमलबजावणी कामी नियोजीत उपाय योजना या सर्व बाबींचा विचार करता अपेक्षित कामे मुदतीत पुर्ण होणार असल्याने आपणा सर्वांच्या सहकार्याने उपलब्ध निधीचा सुयोग्य विनीयोग १००% होईल याचा मा. स्थायी समितीस विश्वास आहे.

**मा. स्थायी समितीने सादर केलेला अपेक्षित जमा व अपेक्षित खर्च हा वास्तववादी व सर्व समाज घटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणारा आहे, हे मी नम्रपणे आपल्या निदर्शनास आणून देत आहे.**

पी बजेट, जेंडर बजेट व अंध अपंगासाठीच्या बजेटसह सर्वसाधारण 'अ' अंदाजपत्रक, परिवहन सेवेचे 'ब' अंदाजपत्रक, जल - मल प्रवाह निधीचे क अंदाजपत्रक, वृक्ष प्राधिकरण अंदाजपत्रक, कर्ज निधी अंदाजपत्रक, सॅटेलाईट सिटी योजना अंदाजपत्रक अशा वेगवेगळ्या भागात असलेल्या ₹ ३००० कोटी ७६ लक्ष खर्चाच्या तरतुदी असलेला ₹ ८२ कोटी २५ लक्ष शिलकेचा एकूण ₹ ३०८३ कोटी १ लक्ष रकमेचा वास्तववादी व सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा प्रयत्न करणारा अर्थसंकल्प असुन यावर दि. ०३/०२/२०१४ ते ०७/०२/२०१४ या कालावधीत सर्वकष विचार विमर्ष करुन अर्थसंकल्प मा. स्थायी समितीने मा. महासभेपुढे सर्वानुमते शिफारस केला आहे.

**अर्थसंकल्पातील महत्वाच्या खालील तरतुदींचा उल्लेख मी करु इच्छितो,**

जमा बाबी

| | | |
|---|---|---|
| १) | अनुदान उत्पन्न | - ₹ १३६३ कोटी ४७ लक्ष ४५ हजार |
| २) | कर्ज | - ₹ ३९३ कोटी १ लक्ष |
| ३) | कराचे उत्पन्न | - ₹ ४५५ कोटी ४२ लक्ष ५५ हजार |
| ४) | प्रारंभिक शिल्लक | - ₹ ४४० कोटी २७ लक्ष |
| ५) | फी चे उत्पन्न | - ₹ ३४ कोटी ९८ लक्ष ६४ हजार |
| ६) | इतर सेवांचे उत्पन्न | - ₹ १७९ कोटी १८ लक्ष ९१ हजार |
| ७) | किरकोळ जमा | - ₹ २१६ कोटी ६५ लक्ष ४५ हजार |
| | एकूण जमा | - ₹ ३०८३ कोटी १ लक्ष |

खर्च

| | | |
|---|---|---|
| ८) | आस्थापना खर्च | - ₹ १४१ कोटी ३८ लक्ष ७३ हजार |
| ९) | बांधील खर्च | - ₹ १६८ कोटी १४ लक्ष ८५ हजार |
| १०) | इतर आवश्यक खर्च | - ₹ २३७ कोटी ४१ लक्ष ९७ हजार |
| ११) | इतर खर्च | - ₹ २४७ कोटी २० लक्ष ७० हजार |
| १२) | विकास कामावरील खर्च | - ₹ २२०६ कोटी ५९ लक्ष ७५ हजार |
| | एकूण खर्च | - ₹ ३००० कोटी ७६ लक्ष |

१३) महानगरपालिकेत समाविष्ट भुतपुर्व ग्रामपंचायत क्षेत्रात करवाढ किंवा करामध्ये दरवाढ नसल्याने अधिक सेवा सुविधा मिळत असुनही इतर ग्रामपंचायती पेक्षा देखील कमी कर आकारणी.

१४) ५ वर्षे कालावधीचा मालमत्ता कर व पाणीपट्टी आगाऊ भरणाऱ्या करदात्यांना कर रकमेवर १०% दराने प्राप्त होऊ शकणाऱ्या व्याजाइतक्या रक्कमेची कर सवलत देणेची तरतुद तसेच अशा कुटुंबीयांना अपघाती विमा रकमेइतके थेट संरक्षणाचा लाभ देणेसाठी ₹ २ कोटी तरतुद.

या योगे महानगरपालिकेस ₹ २८० कोटी एकरकमी रक्कम उपलब्ध होऊन कमी कर्ज उभारावे लागणेची शक्यता.

१५) सर्व मालमत्तांना कर आकारणी होणेसाठी प्रचलीत दर व आकारणी पद्धत विचारात घेऊन महानगरपालिकेमार्फत पडताळणी सापेक्ष करदात्यांनी स्वयंमुल्य निर्धारण करुन मालमत्ता कर भरणेची सुविधा.

१६) विवीध बँकांचे विवीध शाखांमध्ये कर भरण्याची सुविधा उपलब्ध.

१७) स्थानिक संस्था कर वसुलीचे सर्वात न्युनतम दर, बँकेमध्ये कर भरण्याची सुविधा.

१८) जाहिरातीसाठी जागाभाडे निश्चित करुन जागाभाडे आकारणी. सर्व फलकांवर नियमानुसार काटेकोर कर आकारणी करुन विद्रुपीकरण करणाऱ्यांवर कारवाईचे संकेत. तरतुद ₹ ५ कोटी.

१९) स्वातंत्र्य सैनिक, त्यांची विधवा पत्नी तसेच त्यांचे पुढील पहिल्या पिढीतील एका वारसास त्यांचे राहत्या निवासी सदनिकेस मागणीनुसार मालमत्ता करात १००% सुट.

२०) आजी - माजी सैनिक अथवा त्यांचे अवलंबीतास मागणीनुसार मालमत्ता करात ५०% सुट.

२१) महिला बचत गट व विधवा परितक्त्या महिलांना तसेच महिलेच्या उत्पन्नावर अवलंबीत असलेल्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख अथवा अन्य सदस्य १००% अथवा ८०% अपंग असल्यास अशा कुटुंबातील महिलांना महानगरपालिकेच्या इमारती व गाळे प्रचलीत असलेल्या अल्प वाजवी दराने व्यवसायासाठी उपलब्ध.

२२) नो पार्कींग मधील वाहने उचलून प्रशासकिय शुल्क वसुली प्रभावीपणे राबवली जाणार. यामुळे वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या वाहनांना प्रतिबंध. तरतुद ₹ २० लक्ष ७५ हजार.

२३) रस्त्यावरील विक्रेते व फेरीवाल्यांचे व्यवसाय क्षेत्र निश्चित करुन रहदारीला अडथळा निर्माण होणार नाही अशा पद्धतीने नियंत्रण आणून ना फेरीवाला क्षेत्र निश्चितीचा प्रस्ताव.

२४) तंबाखू जन्य पदार्थ शाळागृहांजवळ विकणेस शासकिय धोरणानुसार प्रतिबंध करुन सार्वजनीक ठिकाणी थुंकणे इ. अस्वच्छता निर्माण करणाऱ्या बाबींसाठी बिट मार्शल नेमणूक करुन प्रशासकीय शुल्क वसुली.तरतुद ₹ ५ लक्ष.

२५) नवीन योजनांसाठी सद्याचे करदात्यावर बोजा न टाकता नव्याने वाढणाऱ्या लोकवस्तीसाठी विकासकांकडून विविध योजनांसाठी अंशदान मिळणेकरीता पाणीपुरवठा स्त्रोत विकास शुल्क आकारणी. फायर प्रोटेक्शन फी व विकास शुल्क आकारणी इ. नगररचना विभागामार्फत ₹ १६० कोटी उत्पन्न अपेक्षित.

२६) i) "यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी," योजनेअंतर्गत शासनाच्या निर्देशाप्रमाणे सादर केलेल्या प्रस्तावानुसार ₹ १४९५ कोटी खर्चाच्या पाणीपुरवठा वितरण व्यवस्थेच्या कामासाठी तीन टप्प्यांपैकी पथम टप्प्यात ₹ ४७० कोटी ९२ लक्ष अनुदानासह ₹ ५२३ कोटी २५ लक्ष खर्चाची तरतुद.

ii) महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान योजनेअंतर्गत मंजुर ₹ २६९ कोटी ७९ लक्ष रकमेच्या सुर्या विस्तारीत १०० दश लक्ष लिटर प्रतीदिन पाणीपुरवठा योजनेसाठी ₹ १३४ कोटी ८९ लक्ष अनुदान निधी व ₹ ११ कोटी ८४ लक्ष अनुदानेतर बाबींसह ₹ २८१ कोटी ६३ लक्ष खर्च अपेक्षित, कामाच्या निविदा कार्यवाहीस सुरुवात.

iii)सुजल निर्मल अभियानांतर्गत पाणीपुरवठा सुधारणा कामे योजनेतुन ₹ ७ कोटी ६८ लक्ष खर्चाच्या जल व उर्जा लेखा परिक्षणासाठी ₹ ५ कोटी ३७ लक्ष अनुदान मंजुर.

iv)१८० दशलक्ष लिटर प्रतिदिन पाणी पुरवठा करणाऱ्या सुसरी धरणासाठी ₹ १६ कोटी इतकी रक्कम महानगरपालिकेने भरणा केली आहे.

सुर्या नदी पात्रात ५ ठिकाणी कोल्हापुरी पद्धतीचे बंधारे बांधणे तसेच कवडास धरणाची उंची वाढवुन व गेट बांधून एकूण ३२.५० दश लक्ष घन मिटर चा प्रकल्प राखुन ठेवणेसाठी प्रयत्न सुरू आहेत. यासाठी सर्व्हेक्षण व प्राथमिक खर्चासाठी ₹ २० लक्ष इतका निधी महानगरपालिकेने भरणा केला आहे.

प्रतिदिन ६ दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे राजीवली धरण व प्रतिदिन १७ दश लक्ष लिटर पाणीपुरवठा उपलब्ध होऊ शकणारे सातिवली धरण योजनेस साठवण तलाव बांधकाम करण्यासाठी चाचणी निष्कर्ष, अन्वेशण, संकल्पन व वनजमिनी प्रस्ताव तयार करुन मंजुरी इ. प्राथमिक खर्चाकरीता प्रत्येकी ₹ १ कोटी प्रमाणे ₹ २ कोटी इतका निधी महानगरपालिकेने भरणा केला आहे. वरीलप्रमाणे जलसंपदा विभागास एकुण रक्कम ₹ १८ कोटी २० लक्ष इतका निधी भरणा केला आहे.

याव्यतिरीक्त ₹ ६५० कोटी योजनेच्या देहरजा प्रकल्प योजनेसाठी एन. पी. व्ही भरणेसह इतर कामांसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ १५२ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ २०० कोटी इतकी तरतुद आहे.

v)याव्यतिरीक्त कामण, तिल्हेर, खोलसापाडा, हत्तीपाडा या प्रकल्पासाठी पाठपुरावा करुन वाढीव जलउद्भव कर्ज निधीतून उपलब्ध करणेसाठी प्रयत्न सुरु आहेत.

vi) मासवण, सायवन, मेढा, पांढरतारा व खानीवडे हे बंधारे हस्तांतरणासाठी सन २०१३-१४ व सन २०१४-१५ मध्ये अनुक्रमे ₹ ५० लक्ष व ₹ १ कोटी ५० लक्ष इतकी तरतुद आहे.

vii)पाणीपुरवठा प्रकल्प व जागामोजणी सर्व्हेक्षण खर्चासाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ३० लक्ष व सन २०१४-१५ मध्ये ₹ १ कोटी इतकी तरतुद आहे.

viii)अंतर्गत जलवाहीनी व्यवस्थेसाठी स्वनिधीतुन सन २०१३-१४ मध्ये ₹ १६ कोटी ३७ लक्ष व सन २०१४-१५ मध्ये ₹ ३ कोटी ५० लक्ष इतकी स्वतंत्र तरतुद आहे.

ix) सन २०१४-१५ मध्ये सार्वजनिक विहीर सफाई व गाळ काढण्यासाठी ₹ १ कोटी तसेच कुपनलीका खोदाईसाठी ₹ ६ कोटी तरतुद आहे.

x) पाणीपुरवठा योजनेच्या कर्ज परतफेडीसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ११ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ २६ कोटी २५ लक्ष ९८ हजार इतकी तरतुद आहे.

पाणीपुरवठा सेवेसाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ २५० कोटी ७१ लक्ष २४ हजार इतकी तरतुद असुन सन २०१४-१५ मधे यु. आय. डी. एस. एस. टी / यु. आय. डी. एस. एस. एम. टी. योजना अंदाजपत्रकातील ₹ ५२३ कोटी २५ लक्ष तरतुदीसह ₹ १०६३ कोटी ७६ लक्ष २३ हजार इतकी तरतुद आहे.

xi) आगाशी, बोळींज व नालासोपारा येथे प्रगतीपथावर असलेल्या मार्केट विकासासाठी मत्स्यविकास महामंडळाकडून ₹ ६ कोटी ८२ लक्ष अनुदान मंजुर झाले असुन ₹ २ कोटी २१ लक्ष ९४ हजार इतकी रक्कम प्रत्यक्ष प्राप्त झाली आहे. सन २०१३-१४-१५ मध्ये ₹ ४ कोटी ६० लक्ष ६ हजार अनुदान अपेक्षित आहे.

xii) ₹ ८०० कोटी खर्चाच्या रिंगरोड प्रकल्पासाठी जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थान महाअभियान योजनेअंतर्गत ₹ ७५ कोटी अनुदान व ₹ ७५ कोटी कर्ज निधीसह प्रथम टप्प्यात ₹ १९४ कोटी खर्च अपेक्षित, प्रक्रियेस सुरुवात.

xiv)एकात्मीक तलाव संवर्धन योजनेअंतर्गत तलाव शृंखला संवर्धनानुसार (चेन ऑफ लेक) ₹ ७० कोटी अनुदानासह ₹ १०० कोटी खर्च अपेक्षित.

xv)राजीव आवास योजनेअंतर्गत शहरी गरीब लोकांसाठी ₹ ६० कोटी खर्चाच्या गृहनिर्माण प्रकल्पासाठी ₹ ३० कोटी अनुदान अपेक्षित.

xvi) सॅटेलाईट सिटी योजनेअंतर्गत मंजुर आकृतीबंधानुसार घनकचरा व्यवस्थापन व पहिल्या टप्प्यातील भुयारी गटार योजनेसाठी ₹ ४४ कोटी ७ लक्ष ८६ हजार अनुदान प्राप्त झाले असुन

₹ ७५ कोटी ५ लक्ष ५५ हजार अनुदान अपेक्षित. तसेच नागरी क्षेत्रातील उर्वरीत भागासाठी शासनाच्या निर्देशानुसार शिफारस झालेल्या प्रस्तावानुसार ₹ १२३२ कोटीच्या चार टप्प्यातील प्रकल्पापैकी ₹ ३०८ कोटीच्या प्रथम टप्प्यासाठी ₹ २७७ कोटी २० लक्ष अनुदान अपेक्षित.

२७) महानगरपालिका क्षेत्रातील खाजगी शौचकुपांची प्रत्यक्ष सफाई सेवा वर्षातुन एकदा निशुल्क व तद्नंतर प्रचलित दराने आकारणी.

२८) शहरांतर्गत प्रत्यक्ष अग्निशमन सेवा निशुल्क.

२९) महानगरपालिका क्षेत्रातील दहन दफन भुमीमध्ये मागणीनुसार सर्व धर्मीयांचे दहन विधीसाठी मोफत लाकडे तसेच दफन संस्कारासाठी ₹ १०००/- ठोक अनुदान.

३०) सर्वधर्मीयांच्या दफन भुमीसाठी भुसंपादनासह अस्तित्वातील दहन दफन भुमीचे सुशोभिकरण व विद्युत दाहीनी आणि गॅसदाहीनी सेवेत दाखल करणे इ. साठी ₹ २५ कोटी तरतुद. पर्यावरण संरक्षणासाठी विद्युत दाहिनी व गॅस दाहिनीचा वापर करणेस प्रोत्साहीत करण्यासाठी मयत व्यक्तीचे निकटतम् नातेवाईकास मागणीनुसार ठोक ₹ १०००/- इतके तात्काळ अर्थसहाय्य देणेची तरतुद.

३१) महानगरपालिकेच्या रुग्णालयीन सेवेचा दर्जा सुधारणेसाठी विशेष भर, नालासोपारा येथील रुग्णालय खाजगी संस्थेमार्फत चालवणेसाठी अनुदान देणेची तरतुद, महानगरपालिका क्षेत्रातील रुग्णांसाठी श्वान दंश व सर्प दंश इंजेक्शन मोफत देणेची तरतुद, तसेच महानगरपालिकेच्या रुग्णालयात जेनेरीक मेडीसीन उपलब्ध करणेची तरतुद. डायलेसीस उपचारासाठी सर्व रुग्णालयांकडून याबाबतची दर पत्रके मागवुन त्यापैकी प्रतीरुग्ण कमाल ₹ ७५०/- पर्यंत दर घेणाऱ्या रुग्णालयांना प्रतीरुग्ण ₹ ३५०/- इतका खर्च महानगरपालिकेमार्फत अनुदान स्वरुपात देणेची महिला बालकल्याण योजना, युवक कल्याणकारी योजना व जेष्ठ नागरीकांसाठीच्या योजना यामध्ये तरतुद असुन. डायलेसीससाठी महानगरपालिका ठरवुन देईल अशा दराने डायलेसीस करणाऱ्या रुग्णालयांना महानगरपालिकेमार्फत मशिन पुरविणे इत्यादीसह रुग्णालय व्यवस्थापनासाठी ₹ ३२ कोटी ८३ लक्ष ३५ हजार इतकी तरतुद.

महानगरपालिकेचे कर मुदतीत भरणाऱ्यांना हेल्थ कार्ड उपलब्ध करुन देऊन महानगरपालिकेच्या रुग्णालयात रक्त तपासणी, ई.सी.जी, एक्सरे, इ. तपासणीसाठी सर्वसामान्यांना ५०%, तसेच अंध, अपंग आणि महिला व बालकांना १००% सवलत दिली जाणार आहे.

३२) प्रभाग स्तरावर वाचनालये निर्मिती व ई-ग्रंथालय उपलब्ध करणेसह एकूण वाचनालय व्यवस्थेसाठी ₹ १ कोटी ५३ लक्ष ९० हजार इतकी तरतुद

३३) शाळा, महाविद्यालय व ग्रंथालयांनी त्या - त्या संस्थे बाहेरील युवकांसाठी स्पर्धा परिक्षेची पुस्तके उपलब्ध करुन देऊन अभ्यासिकेची व्यवस्था केल्यास अशा संस्थांना थंड पिण्याच्या पाण्याची यंत्र, विद्युत जनित्र / इन्व्हर्टर इ. साधनसामुग्री पुरविणेची तरतुद तसेच संस्थेबाहेरील विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका उपलब्ध करणाऱ्या मराठी, हिंदी, गुजराथी, उर्दू व अन्य भारतीय भाषिक माध्यमाच्या शाळांना सर्व शालेय विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त थंड पीण्याच्या पाण्याची यंत्रे, क्रिडासाहित्य, प्रयोग शाळेतील साहित्य, विद्युत जनित्र / इन्व्हर्टर / सौर उर्जा व्यवस्था इ. साधन सामुग्री पुरविणेसाठी ₹ ५३ लक्ष इतकी तरतुद.

३४) ऑगस्ट २०१४ अखेर विविध २८ जातींच्या उपलब्ध ६ लक्ष रोपांची लागवड करणेची तरतुद. महानगरपालिका क्षेत्रातील इच्छुक व्यक्ती संस्थांना मागणीनुसार बहावा, बकुळ, डाळींब, सिताफळ, सफेद अर्जुन, सुरु इ. रोपे मोफत उपलब्ध करुन रोपण व संवर्धनासाठी प्रती रोपास रोपाच्या जातीप्रमाणे वार्षिक ₹ २००/- ते ₹ ५००/- प्रमाणे ३ वर्षे अनुदान देणेची तरतुद. वृक्ष प्राधिकरणाच्या कामांसाठी एकूण ₹ २० कोटी १४ लक्ष इतकी तरतुद.

३५) मोनोरेल/मेट्रो रेल प्रकल्पाच्या सर्व्हेक्षण व इतर अनुषंगीक प्राथमिक कामांसाठी ₹ १० कोटी तरतुद.

३६) संपुर्ण शहर वासीयांसाठी "वाय.फाय" सेवा उपलब्ध करणेसह इ-गव्हर्नन्स अंमलबजावणी, महानगरपालिकेची वेबसाईट उपलब्ध करणे, कार्यालयीन कामाचे आय.एस.ओ. प्रमाणपत्र मिळवणे व क्रेडीट रेटींग करुन घेणे यासाठी ₹ ८८ लक्ष इतक्या विशेष तरतुदी.

३७) भुसंपादन करुन सभागृह, नाट्यगृह, सिनेमागृह, नगर वाचनालय व पत्रकार भवनासह नगरभवन इमारत तसेच आयुक्त निवास व महापौर निवास बांधकामासाठी ₹ ६ कोटी इतकी प्राथमिक तरतुद.

३८) आस्थापनेवर नवीन पदे निर्माण करुन कायमस्वरुपी सेवेत पदभरती.

३९) अपारंपारीक उर्जा स्त्रोत निर्मिती प्रकल्पासह एल. इ. डी दिवे व इतर दिवाबत्ती व्यवस्थेसाठी ₹ ३९ कोटी ७५ लक्ष ३० हजार खर्च अपेक्षित.

४०) कोंडवाडा व मादी श्वान निर्बिजीकरण केंद्र उभारणेसह व्यवस्थापनासाठी ₹ १ कोटी ८ लक्ष २५ हजार इतकी तरतुद.

४१) केरकचरा उचलणे व साफसफाईसाठी यांत्रीक झाडू सेवेत दाखल होणार. साफसफाईवरील खर्चासाठी एकूण ₹ ८६ कोटी ९१ लक्ष ८९ हजार इतकी तरतुद.

४२) मच्छिमारांसाठी प्रथमोपचार पेटी, लाईफ जॅकेट, पिण्याचे पाणी शुद्ध राहणेसाठी रसायन मिश्रीत गोळ्या इ. साहित्य पुरवणे, मच्छिमारांना विमा संरक्षण देणे तसेच आपत्कालीन

परिस्थितीत नियंत्रण व मदतीसाठी संबंधीत अभिकरणासमवेत करार करुन हेलीकॅप्टर सेवा उपलब्ध करणेसाठी ₹ ५० लक्ष इतकी तरतुद.

४३) रात्रनिवारा शेडसाठी ₹ ५० लक्ष तरतुदीव्यतिरीक्त ट्रांझीट कॅम्प व आपत्कालीन परिस्थितीत आवश्यक मदत उपलब्ध करणेसाठी ₹ १ कोटी ३६ लक्ष इतकी तरतुद.

४४) महापौर सहायता निधीसह इतर विश्वस्त नोंदणीकृत संस्थांना अनुदान देणेकामी संस्था अनुदानाअंतर्गत तरतुद ₹ १ कोटी.

४५) ₹ १० कोटी ७३ लक्ष खर्चातुन उद्यान, बालोद्यान, वनस्पतीउद्यान यासह विविध उद्याने विकसीत करुन देखभाल दुरुस्तीचे जबाबदारीसह जाहिरातीसाठी ठेका देणेची तरतुद.

४६) शितगृहाच्या उपलब्धतेसह ओलेमासळी मार्केट, मटन मार्केट, सुकी मासळीमार्केट, भाजीमार्केट, फुलमार्केट, इ. मार्केट व बहुउद्देशीय मंडई विकासासाठी सन २०१३-१४ मध्ये ₹ ३ कोटी व सन २०१४-१५ मध्ये ₹ ५ कोटी १० लक्ष इतकी तरतुद.

४७) कृत्रीम तलाव निर्मीती व इतर तलाव विकासासाठी ₹ १०१ कोटी ७८ लक्ष ४५ हजार तरतुद असुन याद्वारे गौरी गणपती विसर्जन, देविच्या मुर्तींचे विसर्जन, छटपुजा व्यवस्था इ. सर्वधर्मीयांच्या देव देवतांच्या मुर्तीचे विसर्जन व पुजाविधीसाठी तलावासह समुद्र किनारी चौपाटीवर विशेष व्यवस्था.

४८) परिवहन सेवेतील ११० बसेसद्वारे सुरळीत सुरु असलेल्या परिवहन सेवेची यशस्वी सुरुवात विचारात घेऊन ३४६ बसेस दाखल करुन डेपो बांधकामासह इतर व्यवस्थेसाठी ₹ १९३ कोटी २२ लक्ष प्रकल्प खर्चास शासनाचे जवाहरलाल नेहरु नागरी पुनरुत्थापन महाअभियान योजनेअंतर्गत मान्यता प्राप्त झाली असुन यासाठी ₹ १४४ कोटी २५ लक्ष अनुदान मंजुर झाल्याने परिवहन सेवेस बळकटी.

संपुर्ण शहरात आवश्यक त्या सर्व मार्गीकांवर परिवहन सेवा सुरु होणार.

ऐतिहासीक, सांस्कृतीक वारसा लाभलेल्या आपल्या या महानगराचे दर्शन घडवणारी पर्यटकांचे आकर्षण ठरुन स्थानिकांना उत्पन्नाचे साधन निर्माण करुन देणारी 'वसई दर्शन' बससेवा देखील लवकरच सुरु करण्याचा इरादा. लांब पल्ल्याच्या मार्गीकादेखील सुरु करण्याचा मानस.

महानगरपालिकेच्या संभाव्य प्रस्तावित धोरणानुसार प्रायोगीक तत्वावरील विनातिकीट परिवहन सेवेसह परिवहन सेवेच्या इतर एकूण खर्चासाठी ₹ ५९ कोटी ९७ लक्ष महानगरपालिका अंशदानाची तरतुद.

परिवहन उपक्रमासाठी ₹ २०७ कोटी १ लक्ष खर्चाच्या तरतुदीचा व ₹ २६८ कोटी २ लक्ष रकमेचा 'ब' अर्थसंकल्प.

४९) नियमीत रस्ते, गतिरोधक, गटर, तलाव, सार्वजनिक ठिकाणी जागेच्या उपलब्धतेनुसार शौचालये व मुतारी बांधकामे, रो - रो फेरी सेवा, नालासोपारा येथील बौद्ध स्तुपापासुन २ कि.मी. च्या परिसरात तसेच वसई किल्ल्यालगतच्या २ कि.मी.च्या परिसरात स्वतंत्र व्यवस्थेअंतर्गत थ्री डी चीत्रफीतीद्वारे माहिती देण्यासाठी चलचित्रपट दर्शवणे, बैठक व्यवस्था, वाचनालय व्यवस्था इत्यादी उपलब्ध करणेकामी ऐतीहासीक मालमत्ता संवर्धन विषयक तरतुद, बहुउद्देशीय इमारती इ. सह आरक्षीत जांगांचा भुसंपादनासह विकास, खुले व बंदीस्त नाट्यगृह, बंदर विकास कार्यक्रमांतर्गत शितगृह व्यवस्था, बर्फ कारखाना, मासळी सुकविण्यासाठी चौथरा बांधकाम, जेट्टीच्या जोडरस्त्याचे काँक्रीटीकरण, उतरता धक्का बांधणे, समुद्रकिनारी संरक्षक भिंती व धुपप्रतिबंधक बंधारा, मासेमारी नौकांचे यांत्रीकीकरण व इतर विकास कामांसाठी ₹ ५१९ कोटी १० लक्ष ८० हजार इतकी तरतुद.

५०) जिल्हा परिषदेच्या शाळा ताब्यात घेणे, शाळागृहांकरीता साधनसामुग्री खरेदी करणे व शाळागृहे ताब्यात येईपर्यंत शाळागृहांची दुरुस्ती देखभाल इ. साठी ५ कोटी ८९ लक्ष तरतुद.

५१) प्राथमीक व माध्यमिक शालेय शिष्यवृत्ती व स्पर्धा परिक्षेतील सर्व प्रवर्गातील यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषीके देऊन गुणगौरव तसेच राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धा परिक्षेस पात्र ठरणाऱ्या विद्यार्थ्यांना अपेक्षित खर्चानुसार अर्थसहाय्य देणेसाठी तरतुद ₹ ८ लक्ष.

५२) शालांत माध्यमिक व उच्च माध्यमिक शालांत परिक्षेतील विशेष प्राविण्य मिळवणाऱ्या पहिल्या १० विद्यार्थ्यांपैकी प्रथम क्रमांकास ₹ १५ हजार द्वितीय क्रमांकास ₹ १० हजार तिसऱ्या क्रमांकास ₹ ५ हजार व अ.क्र. ४ ते १० विद्यार्थ्यांना प्रत्येकी ₹ २ हजार प्रमाणे पारितोषीक देणे व शिष्यवृत्ती देणे तसेच शालेय विद्यार्थ्यांना सायकलीचे वाटप इत्यादीसाठी युवक कल्याण योजनेअंतर्गत तरतुद ₹ २ कोटी.

५३) आंतरशालेय कला क्रिडा महोत्सव, वसई तालुका कला क्रिडा महोत्सव समितीसह इतर क्रिडासंस्थांना अनुदान, महापौर मॅरेथॉनचे आयोजन, राष्ट्रीय, आंतरराष्ट्रीय पातळीवर शासनमान्य स्पर्धासाठी शालेय विद्यार्थ्यांचे संघ पाठवणेसाठी प्रायोजकत्व स्विकारणे, वर्ल्डकप, ऑलिम्पीक एशियाड, राष्ट्रकुल, राष्ट्रीय व इतर तत्सम स्पर्धामध्ये निवड झालेल्या खेळाडूंना प्रोत्साहनपर प्राथमिक खर्चासाठी मदत, यशस्वी स्पर्धकांचा पारितोषीक देऊन सन्मान, चिमाजी आप्पा मैदान विकास, बोळींज येथील मैदान विकास, वालिव येथील हितेंद्र आप्पा मैदान विकास यासह विविध ठिकाणी बंदीस्त व खुली क्रिडांगणे विकसीत करणे इ. क्रिडा विषयक कार्यक्रमासाठी ₹ १७ कोटी ९१ लक्ष ७५ हजार तरतुद.

५४) अद्यावत वाचनालय उभारणीसह व्यवस्थापनासाठी ₹ १ कोटी ५३ लक्ष ९० हजार तरतुद. खाजगी ग्रंथालयांना महानगरपालिकेमार्फत संस्था अनुदानाच्या तरतुदीअंतर्गत अनुदान.

५५) सर्व धर्मिय संस्कृती व इतिहास जोपासना करणाऱ्या कार्यक्रमांचे आयोजन इत्यादीसाठी सत्कार व उत्सव समारंभाअंतर्गत ₹ २ कोटी इतकी तरतुद तसेच असे कार्यक्रम राबविणाऱ्या संस्थाना संस्था अनुदानांतर्गत अनुदान देणेची तरतुद.

५६) विविध रस्ते व सार्वजनीक ठिकाणी दिशादर्शक व स्थळ दर्शक फलक लावुन महानगरपालिकेने केलेल्या कामाच्या ठिकाणी तपशिल नमुद करणारे फलक लावणे इ. साठी ₹ १५ लक्ष तरतुद.

५७) विकास आराखड्यातील विविध अत्यावश्यक ठिकाणी रेल्वे व रस्ते उड्डाणपुल तसेच पादचारी पुल निर्मीतीसाठी ₹ १२ कोटी ७६ लक्ष तरतुद.

यासाठी महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडील सेवानिवृत्त अधिकाऱ्याची सल्लागार म्हणुन नियुक्ती करुन त्यांचे विशेष सल्यानुसार व नगररचना अधिकाऱ्यांचे शिफारशीनुसार जलद कार्यवाही करण्याचे निर्देश.

५८) पाण्याचा पुन:वापर करणेसाठी पाणीपट्टीचे देयकात २% सुट.

५९) नव्याने विकसित केल्या जाणाऱ्या मालमत्तांसाठी रेन वॉटर हार्वेस्टींग योजनेची अंमलबजावणी सक्तीची असुन अस्तित्वात असणाऱ्या सध्याच्या मालमत्तांबाबत रेन वॉटर हार्वेस्टींग प्रकल्प अंमलात आणणाऱ्या मालमत्ता धारकांना याकामी प्रोत्साहन देणेकामी मालमत्ता करामधे सामान्य पाणीपट्टीचा भाग समाविष्ठ असल्याने मालमत्ता कराच्या २% सवलतीसह योजना खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च अदा करणेकामी ₹ ४० लक्ष तरतुद.

६०) सौर उर्जा वापर योजनेसाठी एकत्रीत मालमत्ता करात २ % सुटीसह योजना खर्चाच्या २०% परंतु अधिकतम ₹ १ लक्ष इतका खर्च अदा करणेकामी ₹ २५ लक्ष इतकी तरतुद.

६१) निसर्ग ऋण प्रकल्प राबविणेसाठी एकत्रीत मालमत्ता करात २%सुट.

६२) विशेष बालकांसाठी महिला बालकल्याण योजनेमध्ये असलेल्या तरतुदी व्यतिरीक्त अंध, अपंग, गतीमंद व्यक्ती कल्याणकारी योजनेअंतर्गत तीन चाकी सायकली तसेच इतर आवश्यक साहित्याचे वाटप, परिवहन सेवेमध्ये आवश्यकतेनुसार सोबत्यासह प्रवास खर्चात ५०% सुट, अशा व्यक्तींसाठी कार्य करणाऱ्या संस्थांना अर्थसहाय्य, अंध, अपंग व गतीमंदाच्या अथवा त्यांचेवरील अवलंबीतांच्या विवाहासाठी सामुदायीक विवाह सोहळ्याअंतर्गत अतिरीक्त अर्थसहाय्य. अपंगात्वाबाबतचे आवश्यक दाखले मिळवून देण्यासाठी स्थानिक ठिकाणी शिबीराचे आयोजन, इ. साठी ₹ ३ कोटी १८ लक्ष तरतुद.

६३) शहरातील सार्वजनीक महत्वाचे ठिकाणी सी.सी.टी.व्ही. कॅमेरे व सुरक्षा यंत्रणेसाठी ₹ १ कोटी ५५ लक्ष तसेच पोलिस संरक्षणासह महिला सुरक्षा वाहन व सुरक्षा रक्षक व्यवस्थेसाठी ₹ ८ कोटी ९ लक्ष इतकी तरतुद.

६४) नालेखोदाईसाठी ₹ ४ कोटी तरतुद.

६५) पर्यटन व श्रीक्षेत्र विकासासाठी ₹ ६० लक्ष तरतुद.

६६) विशेष बालकांच्या संगोपनासाठी पालकांना प्रतीबालक मासिक ₹ १०००/- अनुदान, महिला व मुलींसाठीच्या आश्रमांना अनुदान, अनाथ आश्रमांना अनुदान, सामुदायीक विवाह सोहळ्याअंतर्गत सर्वसामान्य वधु अथवा वधुचे पालकाला प्रत्येकी ₹ १००००/- अनुदान, महिलेच्या उत्पन्नावर अवलंबीत असलेल्या कुटुंबातील कुटुंबप्रमुख अथवा अन्य सदस्य १००% अथवा ८०% अपंग असल्यास अशा कुटुंबातील महिलांना विशेष अर्थसहाय्य, अशा व्यक्तींना सामुदायीक विवाह सोहळ्यातील वर वधुसाठी निश्चित अनुदानाव्यतिरीक्त अतिरीक्त अर्थसहाय्य, इ. महिला बालकल्याण योजनांसाठी ₹ २० कोटी २० लक्ष ७१ हजार इतकी तरतुद.

महिला बचत गटांना महानगरपालिकेची समाजमंदीरे व सांस्कृतीक भवनाचे व्यवस्थापन सोपवणेची तरतुद.

६७) इतर विकास कामांच्या तरतुदी अंतर्गत जेष्ठ नागरीकांसाठी स्कायवॉक तसेच उड्डाणपुलाजवळ सरकते जिने व उद्वाहन व्यवस्था, उद्यान व्यवस्थेच्या तरतुदीअंतर्गत नाना-नानी पार्क, सार्वजनीक व मोक्याचे ठिकाणी बैठक व्यवस्था, परिवहन सेवेत ५०% प्रवास भाडे सवलत, संस्था अनुदानाअंतर्गत जेष्ठ नागरीकांमार्फत चालवल्या जाणाऱ्या संस्थांना त्यांचे कार्यक्रमांसाठी अनुदान व वृद्धाश्रमांना अनुदान, जेष्ठ नागरीकांच्या नोंदणीकृत संस्थांना उद्यान देखभालीचा ठेका घेण्यासाठी प्राधान्य, या व्यतिरीक्त स्वतंत्रपणे आरोग्य चिकीत्सा व डायलेसीस उपचारासाठी ₹ ५० लक्ष तसेच विरंगुळा केंद्र व वृद्धाश्रमाचे व्यवस्थापनासाठी ₹ ५० लक्ष ७५ हजार इतकी तरतुद.

६८) शेतकरी व बागायतदारांसाठी साहित्य पुरवठा इ. शेती विकास कार्यक्रमासाठी ₹ ५ कोटी विशेष तरतुद. पात्र लाभार्थ्यांच्या नोंदणीस सुरुवात.

नागरी गरीब घटकासाठी स्वतंत्र वैद्यकिय शिबीर, मेडीक्लेम सुविधा, अपघाती विमा संरक्षण, दलित वस्ती सुधारणा व राजीव आवास योजनेचा लाभ, मच्छिमारांसाठीच्या योजना, मागासवर्गीय कल्याणकारी योजना, नागरी गरीब वस्तीतील विकास कामे इ. बाबींसाठी पी बजेट अंतर्गत ₹ ५९ कोटी ४८ लक्ष ६३ हजार इतकी तरतुद.

असा हा वैशिष्टपुर्ण सर्वसमावेशक बहुजनांच्या प्रगतीचा, विकासाचा अर्थसंकल्प तयार करताना मा. महापौर, मा. उपमहापौर, यांचे मौलीक मार्गदर्शन तसेच मा. सभागृह नेते, विरोधी पक्षनेते, मा. गटनेते, मा. स्थायी समिती सदस्य, सर्व प्रभाग समित्यांचे सन्मा. सभापती, महिला बाल कल्याण समिती सभापती, मा. आयुक्त, व इतर अधिकारी यांनी वेळोवेळी केलेल्या सहकार्याची मी जाणीवपूर्वक नोंद घेत आहे.

आपल्या कामातून "बहुजन विकास हाच प्रगतीचा प्रकाश" हे पालिकेचे ब्रिदवाक्य सार्थ होईल याची मला खात्री असुन त्यासाठी आपण सदैव प्रयत्न करु. यासाठी मा. स्थायी समितीने सादर केलेला हा अर्थसंकल्प मंजुर करणेस माझी विनंती आहे.

वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील सर्व मान्यवर पत्रकार, प्रसार माध्यमे व वसई विरार शहर महानगरपालिका क्षेत्रातील तमाम जनतेने वेळोवेळी आपल्याला सहकार्य केले आहे. त्याबद्दल त्यांचा मी आभारी आहे. मा. स्थायी समितीने मंजुर केलेला हा अर्थसंकल्प मी आपणासमोर सादर केला असुन ही संधी मा. लोकनेते श्री. हितेंद्रजी ठाकूर साहेब, मा. खासदार श्री. बळीरामजी जाधव साहेब, मा. आमदार श्री. विलासजी तरे साहेब, मा. आमदार श्री. क्षितीजजी ठाकूर साहेब, मा. प्रथम महापौर साहेब, मा. प्रथम उपमहापौर साहेब, मा. महापौर साहेब, मा. उपमहापौर साहेब, सर्व पदाधिकारी, माझे मा. स्थायी समितीतील सर्व सहकारी तसेच माझ्या पक्षातील सर्व सन्मा. सदस्य व कार्यकर्ते यांनी दिली याबद्दल मी सर्वांचा सदैव ऋणी राहीन.

धन्यवाद !

जय हिंद ! जय महाराष्ट्र !

आपला,

(अजीव यशवंत पाटील)

सभापती

स्थायी समिती

वसई - विरार शहर महानगरपालिका